ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख ५ मार्च, १९५२ अंक १०

## विविध माहिती

**डेक्कन एअरवेजची विनंती—** डेक्कन एअरवेज ह्या विमान-वहातूक कंपनीला भारत सरकार दर गॅलन पेट्रोलमागें ८ आणे मदत देत आहे. ही मदत डिसेंबर, १९५२ अखेर पर्यंत चालू ठेवावी, अशी विनंती कंपनीतर्फे करण्यांत आली आहे. मदत ऑक्टोबर अखेर बंद करण्यांत येणार असल्याचें सरकारनें कळविलें होतें. कंपनीची विनंती मान्य झाल्यास तिला ६ लाख रुपये मिळतील.

**पारनेरा येथें औषधांचा कारखाना—** बलसाडपासून सहा मैलावर असलेल्या पारनेरा या गांवीं रंग, रसायनें आणि औषधें तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यांत आला आहे. कारखाना काढण्याच्या कामीं अमेरिकन सायनॅमिड कंपनी ह्या परदेशी कंपनीचें सहकार्य घेण्यांत आलें आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल पांच कोटी रुपयाचें असून वसूल भांडवल १ कोटी रुपये आहे. त्यापैकीं ९० टक्के भांडवल भारतीय आहे.

**भारतामधील अफूचें उत्पादन—** संयुक्त राष्ट्रसंघानें सेंट्रल ओपिअम बोर्ड ह्या नांवाची एक संघटना उभारलेली आहे. ह्या बोर्डानें आपल्या अहवालांत अशी टीका केली होती कीं, भारत सरकार आपल्या राज्यांतील अफूचें उत्पादन व सांठा ह्यांच्या-संबंधीं नीटसें नियंत्रण ठेवूं शकत नाहीं. ह्या टीकेविरुद्ध भारतीय सरकार तक्रार करणार आहे. नवीन घटना अंमलांत आल्यावर सरकारी नियंत्रण सुव्यवस्थित अंमलांत आणल्याचें भारतीय सरकारचें म्हणणें आहे.

**विमानानें प्रवास करणाऱ्यांचा विमा—** मद्रास सरकारचे जे अधिकारी कामासाठी विमानानें प्रवास करीत असतील त्यांचा विमा सरकारी खर्चानें उतरण्याचा विचार राज्य-सरकार करीत आहे. सध्याच्या नियमाप्रमाणें अशा सरकारी अधिकाऱ्यांना जें पेन्शन अगर इतर भत्ते देण्यांत येतात त्याच्याशिवाय वरील विमा उतरण्यांत येईल. वैमानिक प्रवासाच्या जोखमेची तरतूद करण्याचा हेतू ह्या योजनेमागें आहे.

**अंबाला शहरांतील पहिली ट्यूब विहीर—** चांदीगड कॅपिटल प्राजेक्ट ऑर्गनायझेशनतर्फे अंबाला शहरांत पहिली ट्यूब विहीर नुकतीच खणण्यांत आली. तिला चांगलें पाणी लागलें असून सध्याच दर तासाला ८,००० गॅलन पाणी उपसण्यांत येत आहे. ही विहीर जरूर तितकी खोल गेल्यावर दर तासाला १५ ते २० हजार गॅलन पाणी निघूं शकेल, असा अंदाज आहे.

**भारताला ऑस्ट्रेलिआचा गहूं—** भारतानें ऑस्ट्रेलिआकडून सुमारें ३०,००,००० पौंड गहूं मागविला आहे, त्यापैकीं कांहीं बोटीवर चढविण्यांत आला आहे. भारताकडून व पाकिस्तानकडून कोलंबो योजनेप्रमाणें यंत्रसाहित्याच्या ज्या मागण्या करण्यांत आल्या आहेत त्या पुऱ्या करण्याबाबत सध्या विचार चालू आहे.

**रत्नागिरीला टेलिफोनची सोय—** रत्नागिरी शहरांत लवकरच एक टेलिफोन एक्सचेंज उघडण्यांत येणार आहे. एंजिनिअरिंग सुपरवायझर ऑफ टेलिफोन्स ह्यांनीं नुकतीच गांवाला भेट देऊन ह्यासंबंधीं तपासणी केली. टेलिफोन घेऊं इच्छिणाऱ्या नागरिकांच्या गांठीभेटीहि त्यांनीं घेतल्या.

**हैड्रोजन बॉंबचा धडाका—** चालू वर्षी अमेरिका आपल्या पहिल्या हैड्रोजन बॉंबचा स्फोट पॅसिफिक महासागरांतील ऐनिवि-टॉक ॲटॉल ह्या बेटावर घडवून आणणार असल्याची बातमी आहे. हैड्रोजन बॉंबची निर्मिति करण्याचे प्रयत्न गेल्या वर्षा-पासून अमेरिकेनें विशेष जोरानें चालविले होत.

**ब्रिटननें भांडवल काढून घेतलें—** सिलोन सेंट्रल बँकेनें प्रसिद्ध केलेल्या अहवालाप्रमाणें, १९५१ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत ब्रिटननें सीलोनमधून ८,४७,५०० पौंडांचे खाजगी भांडवल काढून घेतलें. ह्या भांडवलाची रुपयांत किंमत सुमारें ३,२९,००,००० रु. इतकी होते.

**इजिप्तकडून तांदूळ मिळणार नाहीं—** चालू वर्षी भारताला इजिप्तकडून तांदूळ मिळण्याची शक्यता नाहीं, असें समजतें. पाण्याचा अपुरा पुरवठा आणि इतर कारणांनीं इजिप्तमधील भाताचें पीक कमी आलें आहे. गेल्या वर्षी भारताला इजिप्तकडून ६०,००० टन तांदूळ मिळाला होता.

**हिऱ्याची बाजारपेठ लंडनला—** केसाळ प्राण्यांची कातडीं व हिरे यांची प्रमुख बाजारपेठ म्हणून लंडन शहराचें स्थान अद्यापहि कायमच आहे. गेल्या वर्षी लंडनच्या हिरे बाजारांतून ७५ लक्ष पौंड किंमतीचे हिरे विकले गेले. फरच्या कातड्यांनाहि अशीच जोराची मागणी दिसून आली.

**ऑस्ट्रेलिआचे शस्त्रास्त्रांचे कारखाने—** ऑस्ट्रेलिआंत शस्त्रास्त्रांचे कारखाने पुन्हां निघावेत म्हणून सरकारनें अशा व्यापारी कारखान्यांना २,५०,००० पौंडांची मदत देण्याचें ठरविलें आहे. शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांची दुरुस्ती व निकास हीं कामें वरील निधींतून प्रथम करण्यांत येणार आहेत.

### आगपेट्यांच्या धंद्याच्या अडचणी

भारतामधील काड्याच्या पेट्या तयार करणाऱ्या कारखान्यां-पुढें, जरूर त्या मऊ लाकडाचा पुरवठा न होण्याची अडचण उभी असल्याचें समजतें ह्या कारखान्यांना लाकूड पुरविण्यासाठी भारतामधील जंगलांची तोड चालतेली असते. परंतु तोडलेल्या झाडांच्या ऐवजीं नवीन झाडें लावण्याचें काम योग्य वेळीं करण्यांत न आल्यानें मऊ लाकडाच्या पुरवठ्याचा प्रश्न बराच बिकट झाला आहे. उत्तर अंदमान बेटांत योग्य त्या प्रकारचीं झाडें असल्यानें भारतीय कारखानदारांचें लक्ष आतां तिकडे लागलें आहे. काड्याच्या पेट्यांच्या एकाच मोठ्या कारखान्याला दरमहा १,६०० टन लाकडापेक्षांहि अधिक लाकूड लागतें. एका अमुक कारखान्याला तर दरमहा ६,००० टनाइतकें लाकूड लागतें. हा कारखाना काड्याच्या पेट्यांच्या स्थानिक मागणीच्या ६५ टक्के माल पुरवूं शकतो. १९२२ सालीं भारतांत हा धंदा सुरू झाला. म्हणजे आतां त्याला ३० वर्षे पुरीं झालीं आहेत. तत्पूर्वी भारताची बहुतेक मागणी परदेशी काड्याच्या पेट्या आयात करून भागविली जात असे. दरवर्षी सुमारें १·५ कोटी ग्रोस पेट्या भारतांत खपत असत व त्यापैकीं बराच मोठा भाग आयात केला जात असे. भारतांत हा धंदा रुजविण्याचे प्रयत्न झाले. पण कमी प्रतीचा माल, संघटनेचा विस्कळीतपणा आणि तांत्रिक ज्ञानाचा अभाव, इत्यादि कारणांमुळें ते यशस्वी होऊं शकले नाहींत. १९२२ सालीं आयात कर व जकात-कर ह्यांत वाढ करण्यांत येऊन आयातीला बंदी करण्यांत आली.

दक्षिण भारतांत ग्रामोद्योगाच्या पद्धतीनें काम करणारे काड्यांच्या पेट्यांचे बरेच कारखाने आहेत. कारखान्यांतून काम करणारे लोक बहुतेक शेतकरी अगर मजूर आहेत. ते फावल्या वेळीं आपल्या उत्पन्नांत भर घालण्यासाठी घरींच काम घेऊन जातात. शेतीचा हंगाम संपल्यावर पैशाची व रोजगारीची चण-चण भासते. अशा वेळीं शेतकऱ्यांच्या घरांतलीं माणसेंहि घरीं आणलेल्या कामाला हातभार लावतात. इतर देशांशीं तुलना करतां भारतांत दरमाणशीं होणाऱ्या काड्यांच्या पेट्यांचा खप कमी आहे. युरोपमधील काड्याच्या पेट्या भारतांत खपण्याचें मुख्य कारण म्हणजे तेथील कारखान्यांना होणारा मऊ लाकडाचा मुब-लक पुरवठा. शिवाय हें लाकूड भारतांत मिळणाऱ्या लाकडापेक्षां अधिक चांगल्या प्रतीचेंहि असतें.

---

### पर्सनल प्रेस सर्व्हिसचा १५ वा वाढदिवस

श्री. ना. तु. ठाकूर ह्यांच्या पर्सनल प्रेस सर्व्हिसचा १५ वा वाढदिवस ना. काकासाहेब गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. विविध विषयांवरील कात्रणं पुरविण्याच्या कल्पनेपासून तो व्यवसाय म्हणून १५ वर्षे यशस्वी रीतीनें चालविण्याचें मोठें श्रेय श्री. ठाकूर ह्यांचें आहे. महाराष्ट्रांत अशा प्रकारची दुसरी एकहि संस्था नाहीं व भारतांत इतरत्रहि क्वचितच असेल. त्यामुळें म. गांधींचेपासून सामान्य नागरिकांपर्यंत सर्व पदांचे, पक्षांचे व धंद्यांचे लोकांस पर्सनल प्रेस सर्व्हिसच्या सेवेचा फायदा मिळाला आहे व मिळत आहे. श्री. काकासाहेब गाडगीळ हे स्वतः सर्व्हिसचे सुरुवातीपासून सभासद असल्यानें, त्यांनीं संस्थेचा गौरव केला; तो स्वानुभवावर आधारलेला होता.

### जपानकडून पोलादाचा पुरवठा

भारताकडून कोळसा, मँगेनीज, बिडाचें लोखंड, इत्यादि धातू घेऊन त्याच्या बदला जपान पोलाद पुरविण्यास तयार आहे, अशा वार्ता आल्या आहेत. हें खरें असेल तर भारताला पोलादा-च्या पुरवठ्याची एक नवीनच शक्यता उपलब्ध झाली असें होईल. जपाननें निर्यात कमी करण्याचें आणि आयात वाढ-विण्याचें धोरण पौंडी गटांतील देशांशीं चालणाऱ्या व्यापाराबाबत स्वीकारलें आहे. त्यामुळें एरव्हीं जें पोलाद ब्रिटनला निर्यात व्हावयाचें तें भारताला मिळूं शकेल. मुंबईतील कांहीं व्यापारी जपानकडील पोलादाच्या आयातीसंबंधी उत्सुक असल्याचें समजतें. जपानमधील उद्योगपतींना कोकिंग कोल आणि इतर खनिजांची जरूरी आहे. परंतु त्यांचा पुरवठा होण्याची शाश्वति असेल तरच ते पोलादाचा पुरवठा करण्यास तयार आहेत. पौंडी गटांतील राष्ट्रांकडून जपानला या कच्च्या मालाची जरूर आहे त्यासंबंधीं जपानची ब्रिटनच्या पोलादाच्या कारखानदारांशी बोलणीं झालीं. तथापि कच्च्या मालाच्या पुरवठ्याची हमी ब्रिटिश कारखानदारांनीं न घेतल्यामुळें वाटाघाटींतून फारसें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. सध्यां भारतांत अमेरिका, ब्रिटन आणि बेल्जम ह्या देशांकडून दरवर्षी सुमारें १,५०,००० टन पोलाद आयात होतें. त्यामानानें जपानकडन होणारी आयात फार कमी आहे. १९५१–५२ सालच्या पहिल्या आठ महिन्यांत भारतानें जपानकडून ३९ टन नट व बोल्ट्स आयात केले. गेल्या वर्षी ह्याच काळांत ५९८ टन माल आयात झाला होता. उलट-पक्षीं, भारताकडून जपानला निर्यात होणाऱ्या कच्च्या मालांत मात्र वाढ होत आहे. ह्या कच्च्या मालाच्या बदला भारताला जपानकडून अधिक मोठ्या प्रमाणांत पोलाद मिळण्याची शक्यता आहे.

---


दि मिरज स्टेट बँक लिमिटेड, मिरज.

( शेड्यूल्ड बँक )

## नोटीस

नोटीस देण्यांत येतें कीं, बँकेच्या भागीदारांची ता. ३१–१२–१९५१ रोजीं पुऱ्या झालेल्या सालाबद्दल वार्षिक साधारण सभा बँकेच्या दिवाणखान्यांत रविवार ता. २३ मार्च १९५२ रोजीं दुपारीं ४–३० वाजतां खालील कामासाठी भरेल.

१ बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९५१ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट याचा विचार करणें.

२. डिव्हिडंड मंजूर करणें.

३. निवृत्त होणाऱ्या दोन डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.

४. ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

५. अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं कामें.

बोर्डाचे हुकुमावरून,

मिरज, ता २१–२–५२ } के. डी. शिराळकर, मॅनेजर.

वि. सू.: बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १३ मार्च १९५२ ते ता. २६ मार्च १९५२ पर्यंत बंद राहतील.

ता. १३ मार्च १९५२ रोजीं रजिस्टरवर नांवें असलेल्या भागीदारांना डिव्हिडंड मंजूर झालेवर, तें ता. ३० मार्च १९५२ पासून दिलें जाईल.

# अर्थ

बुधवार, ता. ५ मार्च, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

### अमेरिकन गव्हाच्या कर्जाचा सुपरिणाम

अर्थमंत्री, श्री. देशमुख ह्यांनीं १९५२–५३ चें अंदाजपत्रक शुक्रवार ता. २९ फेब्रुवारी रोजीं पार्लमेंटास सादर केलें. सध्या चालू असलेल्या करांच्या उत्पन्नावर तें आधारलेलें आहे. १९५०–५१ च्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें त्या वर्षीं ७·९३ कोटी रुपये वाढावा उरेल अशी अपेक्षा होती, परंतु त्याऐवजीं प्रत्यक्ष वाढावा ५९·२१ कोटी रुपये उरलेला दिसून येतो ! येत्या वर्षीं संरक्षण खातीं १९७·९५ कोटी रु. खर्च होणार आहेत. चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजापेक्षा ही रक्कम ४% जास्त आहे, आणि एकूण उत्पन्नाच्या ती ४९% आहे.

हेंच अंदाजपत्रक, नव्या सरकारास आवश्यक वाटतील त्या दुरुस्त्यांसह, नव्या पार्लमेंटापुढें कालांतरानें मांडलें जाईल. सध्याचे कर चालू रहावे व येत्या चार महिन्यांतील खर्चासाठीं रक्कम उपलब्ध व्हावी, ह्यासाठीं पार्लमेंटाची मंजुरी आतां घेण्यांत येत आहे.

१९५१ सालीं पावसाच्या लहरींमुळें धान्याचा तुटवडा पुनः जाणवला. किंमतवाढीस आतां पायबंद बसला आहे असें दिसतें आणि जुलै १९५१ पासून त्या उतरणीच्या मार्गावर आहेत. १९५१–५२ ह्या वर्षीं सरकारी उत्पन्न–खर्चांत मोठा वाढावा उरला आणि अमेरिकेच्या कर्जातून खरेदी करून आयात केलेला गहूं येथें विकल्यानें मोठी क्रयशक्ति जनतेच्या हातांतून काढून घेण्यांत आली, ह्याचा तो मुख्यतः परिणाम आहे. अंतर्गत औद्योगिक उत्पादन वाढून उपलब्ध मालाचा पुरवठा वाढला त्याचाहि इष्ट परिणाम झाला. घाऊक मालाच्या किंमतींचा इंडेक्स नंबर उतरत असला, तरी कामगारवर्गाच्या रहाणीच्या खर्चाचा इंडेक्स नंबर हळूहळू वाढतच चालला आहे, ही गोष्ट काय दर्शविते ? अप्रत्यक्ष करांचा गिऱ्हाइकांवरील वाढता बोजाच त्यास कारणीभूत आहे.

कोरियन युद्ध सुरू झाल्याबरोबर अमेरिकेनें व इतर देशांनीं साठे करण्यासाठीं खरेदी वाढविली त्यामुळें हिंदी निर्गत वाढली. ती लाट पुढें उतरली. ह्या उलट, सर्व जगभरच किंमती चढल्यामुळें, आपल्या आयातीसाठीं ज्यास्त रक्कम द्यावी लागली. व्यापारतुटीचे दुःखहि वाढलें. ही परिस्थिति १९५२–५३ मध्यें सुधारण्याची फारशी आशा नाहीं. अन्नधान्य, कच्चा माल, यंत्रसामुग्री, इत्यादींची आपली मोठी आयात चालू राहून, निर्गतींत मात्र वाढ होण्याचा संभव नाहीं.

आपल्या देशाची अन्नविषयक परिस्थिति अद्याप बिकट राहिली असली, तरी इतर बाबतींत बरीच प्रगति झालेली आढळते. आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अधिकांत अधिक उपयोग करण्याचा आपला निश्चय येथील लोकांना व परकीयांनाहि पटला आहे, आणि आपल्या देशाची पत निश्चितपणें सुधारली आहे. त्याचा परिणाम म्हणून, परदेशीय सहाय्य सुलभतेनें मिळत रहाण्यांत होईल, अशी अपेक्षा आहे.

अंदाजपत्रकांत १८·७३ कोटी रुपये वाढावा दिसत असला, तर त्यांत १५ कोटी रुपयांची भर पडणार आहे. अन्नासाठीं द्यावयाच्या सबसिडीजसाठीं २५ कोटी रुपयांची तरतूद अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे. परंतु, गेल्याच आठवड्यांत, अन्नमंत्र्यांनीं ही मदत बहुंशीं बंद करण्याचा निर्णय जाहिर केला आहे त्यामुळें त्या तरतुदींपैकीं १५ कोटी रुपये शिल्लक रहाणार आहेत.

१९५१–५२ चे मानानें १९५२–५३ मध्यें उत्पन्न ७३ कोटी रुपयांनीं कमी होणार आहे. त्यांत ४२ कोटींची घट कस्टम्सच्या व २३ कोटींची घट इनकमटॅक्सच्या उत्पन्नांतील आहे.

खर्चाचे बाजूस, संरक्षणावरील खर्चांत १७ कोटी रुपयांची वाढ आहे. पंचवार्षिक योजनेच्या खर्चांतील तपशीलाप्रमाणें, भांडवली व उत्पादक खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे.

भांडवली व चालू, दोन्ही प्रकारचे खर्च हिशेबांत घेतले, तर ५६ कोटी रुपयांची तूट येत आहे. त्यांतून अन्न–मदतीचे वाचणारे १५ कोटी रुपये वजा केले, म्हणजे तुटीची रक्कम ४१ कोटी रु. भरते. वर्षअखेर, रोख शिल्लक ११६ कोटी रु. रहातील असा अंदाज आहे. परदेशीय मदतीपैकीं खर्चीं न पडलेल्या ४० कोटींच्या शिलकीचाहि त्यांत समावेश आहे.

फाळणीनंतरच्या प्रत्येक वर्षीं, चालू उत्पन्नांतून चालू आवश्यक खर्च भागवून वाढाव्यानें भांडवली खर्चास मदत केलेली आहे. १९४८–४९ व १९४९–५० मध्यें, चालू व भांडवली खर्चाचा एकत्रित हिशेब करतां १२४ कोटी रुपये साठलेल्या शिलकींतून खर्चावे लागले. १९५०–५१ मध्यें १२ कोटींचा वाढावा राहिला. १९५१–५२ च्या अंदाजपत्रकांत ५२ कोटींची तूट अपेक्षित होती, परंतु दुरुस्त अंदाजाप्रमाणें ती तूट ४ कोटी रुपयांवर जाणार नाहीं. कर्जउभारणी अपेक्षेपेक्षा ५० कोटी रुपयांनीं कमी झाली, तरी सुद्धां हें शक्य झालें, ह्याचें कारण उत्पन्न विशेष वाढलें हें नसून अमेरिकन कर्जाऊ गव्हानें लावलेला हातभार, हेंच होय. १९५२–५३ मधील अपेक्षित अशी तूट ५६ कोटींची आहे.

अंदाजपत्रकांत इनकमटॅक्स व सुपर टॅक्स ह्यांचेवरील सरचार्ज कायम ठेवण्यांत आलेला आहे. गेलीं कांहीं वर्षें सरकारला देशांतच कर्ज उभारणीचे कामीं इष्ट तें यश मिळालेलें नाहीं व त्याला कर आणि परदेशी कर्जे ह्यांवर मुख्यतः विसंबावें लागलें आहे उत्पन्न–खर्चांतील वाढावा, अमेरिकन कर्ज, इत्यादींतून १९५२–५३ मध्यें १११ कोटी रुपयांचा भांडवली खर्च भागविण्याचा सरकारचा विचार आहे, परंतु खाजगी कारखानदारीस त्यामुळें उपलब्ध होण्यास पैसा उरत नाहीं, अशी तक्रार आहे. खासगी उपक्रमांची भांडवली उपासमार होऊं न देणें, हें सरकारचें कर्तव्य आहे. औद्योगिक उत्पादन–वाढ चालू रहावयाची असेल, तर अधिकाधिक भांडवल उद्योगधंद्याकडे आकर्षिलें गेलें पाहिजे. त्या दृष्टीनें प्रस्तुत अंदाजपत्रकांत योजना दिसत नाहीं. पूर्वी बसविलेले सरचार्ज, १९५१–५२ चे प्रत्यक्ष आकडे पहातां, अनावश्यक ठरले म्हणून त्यांत सूट मिळण्याची अपेक्षा गैरवाजवी म्हणतां येणार नाहीं.

## दि सांगली बँक लि., सांगली

वरील शेड्यूल्ड बँकेची वार्षिक सभा २२ फेब्रुवारी रोजीं भरली होती. त्या सभेनें भागीदारांना १२% करमाफ डिव्हिडंड मंजूर केलें. अहवालाचे वर्षी बँकेला १,१४,९५२ रु. नफा झाला, त्यांतून जनरल रिझर्व्हमध्यें १,००० रु., इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत ९,९४० रु., चॅरिटी फंडांत १,२०० रु., कराची तरतूद ४६,००० रु. व नोकरवर्गास बोनस १५,००० रु. अशी वाटणी करण्यांत आली. बँकेचा जनरल रिझर्व्ह फंड वसूल भांडवलापेक्षांहि ज्यास्त असल्याकारणानें त्या फंडांत नफ्याच्या २०% रक्कम टाकण्याचें कायद्याचें कलम बँकेवर बंधनकारक नाहीं, एवढी तिची मजबूत परिस्थिति आहे. १,४२,५०० रु. शेअर अर्जापोटीं जमा असून, त्या शेअर्सची अलॉटमेंट अद्याप व्हावयाची आहे. अर्थमंत्री, श्री. देशमुख ह्यांनीं ३ नोव्हेंबर रोजीं बँकेस भेट देऊन डायरेक्टरांबरोबर बँकेच्या कामाबाबत खाजगी रीतीनें चर्चा केली. बँकेच्या मुंबई येथील इमारतीवर २ मजले वाढविण्यांत आले आहेत. त्यामुळें तिची किंमत व तिचेवर सुटणारें उत्पन्न ह्यांत वाढ झाली आहे. बँकेचा ताळेबंद ९७ लक्ष, ८३ हजार रुपयांचा आहे. पैशाच्या तंगीच्या ह्या काळांतहि बँकेकडील ठेवींत ३ लक्ष रुपयांची वाढ झाली आहे आणि बँकेनें इतर बँकांकडून घेतलेली रक्कम ५ लक्ष रुपयांनीं कमी झाली आहे. जवळील रोकड व बँकांतील शिल्लक ह्यांचे ठेवींशीं प्रमाण २१% आहे आणि ३१% सरकारी रोख्यांतील गुंतवणूक हिशेबांत घेतली तर त्या जिंदगीचें ठेवींशीं प्रमाण ५४% म्हणजे अत्यंत समाधानकारक आहे. दिलेल्या कर्जांत फार वाढ होऊं न देण्याचें बँकेचें धोरण मजबुतीच्या दृष्टीनें योग्यच आहे. सरकारी रोख्यांच्या किंमतीमधील घटीची झळ इतर बँकांप्रमाणें ह्या बँकेसहि लागणें स्वाभाविक आहे. परंतु, त्यापैकीं कांहीं घट चालू नफ्यांतून काढून टाकण्यांत आली आहे आणि बऱ्याच मोठ्या घटीची योग्य तरतूद करण्यांत आली आहे. १९५१ मध्यें १९५० चे मानानें बराच खर्च वाढला, तरी बँकेचा नफा ७९,००० रु. वरून १,१३,००० रु. वर गेला आणि योग्य तरतुदी करूनहि १२% करमाफ डिव्हिडंड देणें तिला सहज शक्य झालें. बँकेचे चेअरमन, श्री. एस. ई. सुक्थनकर ( कलेक्टर, द. सातारा ) ह्यांनीं आपल्या भाषणांत बँकेच्या प्रगतीबद्दल व मजबुतीबद्दल जे उद्गार काढले, ते वस्तुस्थितीस धरूनच आहेत.

---

**श्री. अरविंदांची काव्य नाटिका**—न्यूयॉर्क येथील भारतीय वकिलातींत योगी अरविंद घोष ह्यांच्या 'सावित्री' ह्या काव्य नाटिकेचा प्रयोग नुकताच करून दाखविण्यांत आला. ह्या प्रयोगांत अमेरिकन टेलिव्हिजनमध्यें काम करणारी नटी, मिस जीन पीअर्सन हिनें सावित्रीचें व मि. ऑस्टिन ब्रिज हॉल ह्यांनीं यमराजाचें काम केलें. मिस जे ह्या अमेरिकन नर्तकीनें हिंदी नृत्यप्रकार करून दाखविले.

---

**उत्तर बोर्निओंत जाणारे हिंदी नागरिक**—नॉर्थ बोर्निओच्या सरकारनें १०,००० भारतीय नागरिकांना वसाहत करण्यासाठी म्हणून सवलती देण्याचें कबूल केलें होतें. ह्यासंबंधी आता अधिक माहिती जाहीर झाली आहे. वसाहत करणाऱ्यांना भाताच्या व इतर अन्नधान्याच्या लागवडीसाठी जमिनी मिळतील. त्याशिवाय कारखाने व मळे इत्यादींवर त्यांना कामहि देण्यांत येईल.

## दि मिरज स्टेट बँक लिमिटेड, मिरज

रिपोर्टाचे सालीं ठेवींवरील दिलेलें व्याज, नोकरवर्गास दिलेला बोनस व इतर खर्च नफातोटा पत्रकांत दाखविल्याप्रमाणें वजा जाता, ता. ३१-१२-१९५१ अखेरचा निव्वळ नफा रुपये ७४,३३९-१४-६ होतो. त्यांत मागील सालचा पुढें ओढलेला नफा रुपये ४४१-१०-७ मिळविल्यावर एकूण नफा रुपये ७४,७८१-९-१ होतो. त्याची वांटणी खालीलप्रमाणें करावी अशी डायरेक्टरांची सूचना आहे :—

| | रु. आ. पै |
|---|---|
| १ जनरल रिझर्व फंड | २३,०००-०-० |
| ( हा फंड आतां ५ लक्ष रु. होईल ) | |
| २ इन्व्हेस्टमेंट्स् खातें | २०,०००-०-० |
| ३ इमारत फंड | १,५००-०-० |
| ४ करमाफ ५% डिव्हिडंड | ३०,०००-०-० |
| ५ पुढील सालचे हिशेबांत ओढण्यास | २८१-९-९ |
| एकूण रुपये | ७४,७८१-९-१ |

बँकेचें वसूल भांडवल ६ लक्ष रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ६ लक्ष रुपयांचे वर आहेत आणि त्यांत आतां सुमारें पाव लाखाची आणखी भर पडणार आहे. ठेवींच्या एकूण रकमेशीं ( ४०,३९,१३१ रु. ) बँकेच्या मालकीच्या भांडवलाचें प्रमाण फारच अनुकूल पडत आहे, ही गोष्ट ठेवीदारांच्या दृष्टीनें अत्यंत समाधानकारक आहे. मिरज स्टेट बँकेच्या चालकांच्या आजवरच्या धोरणाचा हा सुपरिणाम आहे. बँकेची वार्षिक सभा २३ मार्च, १९५२ रोजीं भरणार आहे.

---

## रीडर्स डायजेस्टचा व्याप

रीडर्स डायजेस्ट ह्या सुप्रसिद्ध अमेरिकन नियतकालिकाच्या प्रकाशनाला आतां ३० वर्षें पुरीं झालीं आहेत. ह्या मासिकाचा खप सर्व जगभर होतो. त्याच्या १,५५,००,००० प्रती खपतात. डॅनिश, इंग्लिश, फिनिश, फ्रेंच, जर्मन, इटालिअन, इत्यादि ११ भाषांतून त्याचें प्रसिद्धीकरण होतें. निरनिराळ्या ५९ देशांत त्याच्या आवृत्त्या काढण्यांत येतात. भारत व हॉलंडमध्येंहि स्वतंत्र आवृत्त्या काढण्याची तयारी सध्या चालू आहे. ह्या मासिकांत इतर अमेरिकन मासिकांतील उत्तम लेख सोप्या भाषेंत, पण संक्षिप्त स्वरूपांत, छापले जातात. केवळ करमणूक करणारे लेख मात्र त्यांत नसतात. शास्त्रीय स्वरूपाचे लेख, वैद्यकीय लेख, विनोदी लेख आणि इतर भारदस्त व माहितीपूर्ण लेख मासिकांत येत असल्यामुळें तें मासिक निरनिराळ्या देशांत लोकप्रिय झालेलें आहे. त्याशिवाय डायजेस्टचे स्वतःचे कांहीं लेखक असून ते पुष्कळदां मुद्दाम प्रवास करून प्रासंगिक लेख लिहीत असतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एखाद्या पुस्तकाचा संक्षिप्त गोषवाराहि प्रत्येक मासिक अंकांत देण्यांत येतो. मासिकाच्या परकीय भाषांतील आवृत्त्या त्या त्या देशांत छापण्यांत येतात. त्यांचें भाषांतर, संपादन व मुद्रण त्या त्या देशांतच करण्यांत येतें. ज्या भाषेंतील आवृत्ति असेल त्याच भाषेंतील संपादक व इतर अधिकारी वर्ग निवडण्यांत येतो. आंधळ्यांच्यासाठी ब्रेल लिपींत छापलेली ३१,००० प्रतींची एक आवृत्तीहि काढण्यांत येते.

### अंदाजपत्रक–प्रमुख आकडे

| | उत्पन्न | खर्च | वाढवा |
|---|---|---|---|
| १९५१-५२ अंदाज | ४०१·८९ | ३७५·७९ | २६·१० |
| १९५१-५२ दुरुस्त अंदाज | ४९७·६७ | ४०५·०६ | ९२·६१ |
| १९५२-५३ अंदाज | ४२४·९८ | ४०६·२५ | १८·७३ |

### संरक्षणावरील खर्च

| | १९५२–५३ |
|---|---|
| | कोटी रु. |
| लष्कर | १४८·६९ |
| आरमार | ११·०३ |
| विमान दल | २२·६५ |
| इतर खर्च | १५·५८ |
| एकूण | १९७·९५ |

### सुपर फॉस्फेटच्या प्रचाराची आवश्यकता

भारतांतील कारखान्यांत जेवढें सुपर फॉस्फेट तयार होऊं शकतें, तें सर्व खपण्याइतका त्याचा उठाव नाहीं. म्हणून, ह्या खताच्या वापराचा प्रचार करण्यासाठी एक सुपर फॉस्फेट बोर्ड नेमण्यांत यावें, अशी टारिफ बोर्डाची शिफारस आहे. केवळ भारतांतच नव्हे, तर आशियांतील इतर देशांतहि सुपर फॉस्फेटला मोठी बाजारपेठ मिळण्याची शक्यता आहे. कारण तेथील जमिनींत फॉस्फॉरिक ॲसिडचें प्रमाण अल्प असून तेंहि पिकांना सहज पचवितां येण्याजोग्या स्वरूपांत नाहीं. पाण्यांत चटकन् विरघळूं शकणारें मोनो कॅल्शम फॉस्फेट व कॅल्शम सल्फेट ह्यांचें मिश्रण म्हणजेच सुपर फॉस्फेट जमिनींत मिसळलें, म्हणजे त्याचें फॉस्फॉरिक ॲसिड विरघळून जातें. सुपर फॉस्फेट घालावयाचें, त्याचें प्रमाण पिकाप्रमाणें ठरवावें लागतें.


## नोटीस.

### दि बँक ऑफ् कराड लिमिटेड, कराड.

बँकेच्या भागीदारांची सहावी साधारण सभा शनिवार तारीख १५ मार्च १९५२ रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत भरणार आहे. सदर वेळीं आपण अगत्य येणेचें करावें अशी विनंति आहे.

सभेपुढील कामें:—

१. बँकेचा ता. ३१–१२–१९५१ अखेर संपलेल्या वर्षाचा ताळेबंद व नफातोटा पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट यांचा विचार करणें व मंजूर करणें.

२. डिव्हिडंड मंजूर करणें.

३. निवृत्त होणाऱ्या व फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या डायरेक्टरांचे जागीं तीन डायरेक्टरांची निवडणूक करणें.

४. ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

५. अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं कामें.

कराड,
ता. १०–२–१९५२.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून,
म. वि. खंडकर,
मॅनेजर.

विशेष सूचनाः—बँकेची शेअर ट्रॅन्सफर बुकें ता. ८ मार्च १९५२ ते २२ मार्च १९५२ पावेतों ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.


### अंदाजपत्रकांतील उत्पन्न–खर्चाचा तपशील

#### जमा

| खातें | १९५१–५२ अंदाज | १९५१–५२ दुरुस्त अंदाज | १९५२–५३ संकल्प |
|---|---|---|---|
| कस्टम्स | १५६ | २३२ | १९० |
| एक्साइज | ८० | ८४ | ८६ |
| कॉर्पोरेशन टॅक्स | ३३ | ३८ | ३१ |
| इन्कमटॅक्स | ८५ | ८५ | ६९ |
| अफू | २ | ३ | २ |
| व्याज | २ | २ | १ |
| टांकसाळ | १२ | ११ | ९ |
| कारभार | ८ | १० | १० |
| इतर | १४ | २१ | ८ |
| पोस्ट | २ | ४ | १ |
| रेल्वे | ७ | ७ | ८ |
| विविध | १ | १ | ९ |
| एकूण | ४०२ | ४९८ | ४२५ |

#### खर्च

| खातें | १९५१–५२ अंदाज | १९५१–५२ दुरुस्त अंदाज | १९५२–५३ संकल्प |
|---|---|---|---|
| कारभार | १४ | १७ | १७ |
| व्याज | ३७ | ३७ | ३६ |
| मुलकी | ५४ | ५७ | ५६ |
| टांकसाळ | ३ | ३ | ३ |
| बांधकामें | १३ | १३ | १५ |
| पेन्शन | ७ | ९ | ८ |
| निर्वासित | १० | १४ | १० |
| अन्नधान्य | २६ | ३९ | २५ |
| प्रांतांना देणें | १५ | १८ | २० |
| संरक्षण | १८० | १८१ | १९८ |
| इतर | १६ | १७ | १९ |
| एकूण | ३७५ | ४०५ | ४०६ |


## NOTICE

### BHOR STATE BANK, LIMITED

Notice is hereby given that the Eighth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bhor State Bank Ltd., will be held on Friday the 21st March 1952 at 4 P. M. ( S. T. ) at 361-362, Budhwar Peth, Poona 2 to ( 1 ) receive and consider the Balance Sheet and Profit and Loss Account and the Report of the Auditors for the year ended 31st December, 1951. ( 2 ) to declare a dividend ( 3 ) to elect Directors in place of those retiring ( 4 ) to appoint Auditors ( 5 ) Any other business with the permission of the Chairman.

Bhor,
10th Feb. 1952

By order of the Board
R. G. Agashe,
Manager.

*N. B.*—The Share Transfer books of the Bank will be closed from 16th March to 31st March, 1952 ( both days inclusive ).

## मि. यूजीन ब्लॅक व अमेरिकेकडून मिळणाऱ्या कर्जाची शक्यता

जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. यूजीन ब्लॅक यांनीं, हिंदमधल्या निरनिराळ्या विकासयोजनांची पाहाणी केल्यावर मुंबई येथें वृत्तपत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत असे विचार व्यक्त केले कीं पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट असलेल्या कांहीं विशिष्ट योजनांना कर्ज देण्याबद्दल आपण बँकेच्या बोर्डाला शिफारस करूं. याशिवाय इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्या संस्थेलाहि मध्यम आकाराच्या व लहान स्वरूपाच्या धंद्यांना मदत करण्यासाठीं कर्ज देण्याबद्दलहि ते शिफारस करणार आहेत. किती रकमेचें कर्ज देण्याबद्दल शिफारस केली जाईल हें सांगण्याचें त्यांनीं नाकारलें. हिंद सरकारनेंहि निश्चित रकमेची मागणी केलेली नसून मोघम रीतीनें कांहीं हातीं घ्यावयाच्या योजनांना मदत मिळण्याबद्दल सुचविलें होतें. अमेरिकेचें खाजगी भांडवल येथें गुंतविलें जाण्याची शक्यता कितपत आहे, याबद्दल त्यांना प्रश्न विचारला असतां ते म्हणाले कीं अमेरिकेतील भांडवल गुंतविणाऱ्या लोकांबद्दल आपल्याला कांहीं सांगतां येणार नाहीं; परंतु पैसा मिळेल तेथें अमेरिकन भांडवल गुंतविलें जावयास तयार असतें असें त्यांनीं सांगितलें. खुद्द अमेरिका व दक्षिण अमेरिका या देशांत गुंतविलेल्या भांडवलावर जास्त व्याज सुटलें असलें तरी त्याचा अर्थ कमी व्याज मिळणें संभवनीय असणाऱ्या इतर देशांत भांडवल गुंतविलें जाणार नाहीं असा नव्हे. भारतांतील शेतीचें उत्पादन, औद्योगिक उत्पादन, शैक्षणिक व आरोग्यविषयक सुधारणा, याबाबतींत त्यांनीं समाधान व्यक्त केलें. पंचवार्षिक योजना एकंदरींत चांगली असून तिच्या अंमलबजावणीसाठीं हिंदला परदेशांतून कांहीं तज्ज्ञ आणावे लागतील. ते मिळविण्याबद्दल हिंद सरकारचे प्रयत्न चालू आहेत ते योग्य आहेत. जागतिक बँकेनें कर्ज दिलेल्या योजनांचें कार्य कसें चालू आहे तें त्यांनीं उत्सुकतेनें पाहिलें. भोपाळ येथील जमीन सुधारण्याचें कार्य व बोकॅरो पॉवर स्टेशनचें काम याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. पश्चिम बंगाल व बिहार येथील कारखाने व विशेषतः पोलादाचे कारखाने त्यांनीं पाहिले व अंतर्गत वाढती मागणी पुरविण्यासाठीं त्यांचा विकास कसा करतां येईल याची माहिती त्यांनीं मिळविली. जागतिक बँकेनें आतांपर्यंत रेल्वेची पुनर्रचना, जमिनीची सुधारणा करणें व विजेचें उत्पादन वाढविणें या कामासाठीं सुमारें सहा कोटी डॉलर्स कर्ज दिलें आहे. हिंद सरकारनें पाटबंधारे, वीज, पोलाद व खतांची निर्मिति, या बाबतींत कर्ज मागितलें आहे व बँकेनें या गोष्टींची प्राथमिक पाहाणी केली असून, बारकाईनें पहाणी करून निश्चित सल्ला कर्जाच्या बाबतींत देण्यासाठीं तज्ज्ञ पाठविले जातील. जागतिक बँक आणखी कर्ज देऊं शकेल असें दिसतें. परंतु कर्जाची रक्कम हिंदच्या कर्ज परत करण्याच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहील हें उघड आहे.

मांस टिकविण्यासाठीं नवीन युक्ति—उष्ण हवामानांत मांस टिकविण्याची एक नवीन युक्ति रशिअन संशोधकांनीं काढली आहे. मांसावर अल्ट्रा-व्हायोलेट किरणांची प्रक्रिया केल्यानें ते चारपांच दिवसहि शीतपेटिकेंत ठेवल्याशिवाय टिकू शकतें. हा शोध एका व्यापारी संस्थेनें डबाबंद मांस तयार करणाऱ्या एका कारखान्याच्या सहकार्यानें लावला.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

### पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

### मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.


बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.



## भारतीय सहकारी काँग्रेसचें अधिवेशन

मुंबई येथें फेब्रुआरी १९५२ च्या २५।२६।२७ या दिवशीं भारतीय सहकारी परिषदेचें अधिवेशन झालें. या अधिवेशनास जोडून पूरक अशा परिषदा झाल्या. सहकारी चळवळीच्या इतिहासांत या प्रथम भरणाऱ्या अधिवेशनास फार महत्त्व आहे. यापूर्वी सहकारी खात्यांचे रजिस्ट्रार व त्यांचे समवेत कांहीं निमंत्रित निवडक असे बिन-सरकारी कार्यकर्ते जमत असत व त्यांत सहकारी चळवळीसंबंधी निर्णय घेतले जात असत. परंतु भारत स्वतंत्र झाल्यापासून सरकारी अधिकारी व सहकारी कार्यकर्ते एकत्र येऊन सहकारी प्रश्नासंबंधींचा विचार करण्याचा हा योग अपूर्वच होय. शिवाय, या परिषदेंत परदेशांतील प्रतिनिधी मुद्दाम उपस्थित होते, हें एक वैशिष्ट्य समजण्यास हरकत नाहीं. परिषदेचें अध्यक्षस्थान मुंबई राज्यांतील सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते दि. ब. प्रोफेसर काजी यांनीं स्वीकारलें होतें व उद्घाटन भारत सरकारचे शेती व अन्नखात्याचे मंत्री ना. मुनशी यांनीं केलें. ना. मुनशी यांनीं आपल्या भाषणांत सहकारी चळवळीचा धावता आढावा घेऊन, मुंबई-मद्रास वगैरे कांहीं राज्यें सोडल्यास इतरत्र सहकारी चळवळीची समाधानकारक प्रगति झाली नसल्याचें सांगून, कांहीं राज्यांतून शेतकऱ्यास द्याव्या लागणाऱ्या भारी व्याजाच्या दराचा उल्लेख केला व सहकारी चळवळीचें मुख्य कार्य स्वस्त कर्जपुरवठा करणें हेंच असल्याचें सांगितलें. त्यामुळें सहकारी चळवळीचीं जीं इतर अंगें, त्याबाबत फारशी प्रगति झाली नसल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यांचे मतें, शेतकऱ्यांची एक, राष्ट्रीय संघटना असावी व त्याद्वारें शेती उत्पादनाचे प्रयत्न करावेत. भारत सरकार लहान लहान पाणी योजनेसाठी आर्थिक सहाय्य करणार असल्याचें त्यांनीं ध्वनित केलें व मध्यवर्ती सरकारमध्यें सहकारी चळवळीसंबंधीं एखादा विभाग उघडण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याचें मान्य केलें.

दि. ब. प्रो. काजी यांनीं आपल्या भाषणांत सहकारी संघराज्य यासंबंधीच्या कल्पना विशद केल्या. त्यांचे मतें, सहकारी संघ राज्य याचा अभिप्रेत अर्थ हा कीं एका बाजूस उत्पादकांची बलवान संघटना आणि दुसऱ्या बाजूस ग्राहकांची तत्सम संघटना व अशा दोन संघटनांचा समन्वय घालण्यासाठी एक मध्यवर्ती संस्था असणें हा होय. सहकारी पद्धतीनें व सरकारनें करावयाचे व्यापाराबाबतहि परामर्ष घेतांना, प्रो. काजी यांनीं हें काम सरकारनें न करतां सर्व प्रकारचें सहाय्य देऊन तें काम सहकारी संघटनेमार्फत होण्याचा सल्ला सरकारास दिला आहे. सहकारी ग्राहक चळवळ, प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांत स्वतंत्र सहकारी खात्यांची आवश्यकता, मध्यवर्ती सहकारी कौन्सिलची आवश्यकता, सहकारी चळवळीमधील सरकारी अधिकाऱ्याचें नियंत्रण कमी करणें, सहकारी शेती व पंचवार्षिक योजना, वगैरे बाबत त्यांनीं आपल्या भाषणांत निर्देश केला. पंचवार्षिक योजनेंत सहकारी चळवळीस जें स्थान आज दिलें गेलें आहे, त्याबद्दल प्रो. काजी यांनीं असमाधान व्यक्त केलें असून परिषदेनें एक समिति नेमून तिनें पंचवार्षिक योजनेबद्दलचें आपलें मत सरकारकडे कळवावें असें सुचविलें आहे.

परिषदेस आलेल्या परदेशांतील प्रतिनिधींनीं आपआपल्या राष्ट्रामार्फत शुभयश चिंतिलें व संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या प्रतिनिधीनें भारताच्या सहकारी चळवळीस योग्य तें सहाय्य दिलें जाईल, असें आश्वासन दिलें.

सहकारी काँग्रेसच्या पूरक परिषदांमध्यें ज्या विषयांवर चर्चा झाली त्यामध्यें सहकारी शेती, पंच वार्षिक योजना, राज्यसरकारनें सहकारी संघराज्य स्थापण्याच्या दृष्टीनें आत्मसात करावयाचीं सहकारी तत्त्वें, राज्य सरकारनें करावयाचे व्यापार व सहकारी चळवळ, वगैरे विषयांचा समावेश केला गेला व त्यासंबंधींचीं टिपणें तयार करण्यांत आलीं.

परिषदेचें अधिवेशन दिनांक २५, २६ व २७ रोजीं झाल्याचा निर्देश वर आला आहेच. वरील पहिल्या दोन दिवशीं सर्वसाधारण विषयासंबंधीं चर्चा झाली व तिसरे दिवशीं त्याबाबत ठराव करण्यांत आले.

अखिल भारतीय स्वरूपाचें हें अधिवेशन प्रथमच होतें आणि त्या दृष्टीनें हा प्रयत्न यशस्वी झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. सहकार हा प्रश्न राज्यसरकारचे क्षेत्रांतील आहे व प्रत्येक राज्य-सरकारच्या कार्यक्षेत्रांतील नैसर्गिक परिस्थिति, वैशिष्ट्य लक्षांत घेतां तपशीलवार सहकारी कार्यक्रमासंबंधीं एकसूत्री कारभाराचें धोरण ठरवितां येईल किंवा कसें, हा विचाराचा प्रश्न आहे.

या परिषदेमध्यें आजची सहकारी चळवळीची परिस्थिति, तिची झालेली प्रगति, सहकारी चळवळीनें आज स्वीकारणीय जबाबदाऱ्या, पुढें स्वीकारण्याची तयारी व त्यासाठी लागणारी आवश्यक परिस्थिति कीं ज्यामध्यें भांडवल, कार्यक्षम व अनुभवी नोकर वर्ग, यांची आवश्यकता, यासंबंधी चर्चा झाली नाहीं. सहकारी अर्थव्यवस्थेच्या अगर सामाजिक सुधारण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्वीकारण्यास लागणारी कार्यक्षमता व जबाबदारीची जाणीव प्रथम सहकारी चळवळीनें निर्माण झाली पाहिजे. त्या दृष्टीनें परिषदेनें प्रयत्न करावा असेंच आमच्याप्रमाणें सहकारी कार्यकर्त्यांस वाटत असेल असें आम्हांस वाटतें. सहकारी राज्यकारभारांत अगर सरकारी धोरण ठरवितांना त्यामध्यें प्रतिनिधित्व मागणें हें योग्य असलें तरी त्याबाबत आपलें महत्त्व कार्याचे दृष्टीनें वाढविणें हें सहकारी चळवळीच्या कार्याचे महत्त्वावरच अवलंबून राहणार आहे आणि या दृष्टीनें परिषदेनें जर आपला संदेश देशांतील असंख्य अशा खेड्यांतील जनतेस पोचविला तर त्याचा इष्ट असाच परिणाम होईल, असें वाटतें.

---

### स्पेन्सर आणि कं. लि.

वरील कंपनीच्या मालकीचे दक्षिण भारतांत कित्येक स्टोर्स आहेत आणि दिंडिगुल येथें तिचा सिगार करण्याचा कारखाना आहे. कित्येक हॉटेल्सहि तिच्या मालकीचीं आहेत. भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानांतील धंदा स्पेन्सर आणि कं. (पाकिस्तान) लि. ला विकण्यांत आला. भारतांतील कंपनीस ३० जून, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी २७० लक्ष रुपयांचें उत्पन्न झालें, आणि सर्व तरतुदी करून १३$\frac{1}{2}$ लक्ष रु. नफा उरला. ऑर्डिनरी भागांस १०% करमाफ डिव्हिडंड देण्यांत आलें. धंद्यांतील देण्यांपेक्षा रोख बाळगलेली रक्कम २५$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांनीं अधिक आहे!

---

**टोळांच्या नाशासाठी अधिक विमानें**—दक्षिण आशिया आणि मध्यपूर्व ह्या भूभागांतील टोळांचा नाश करण्यासाठी अमेरिकेनें आणखी आठ विमानें धाडण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेच्या टेक्निकल को-ऑपरेटिव्ह ॲडमिनिस्ट्रेशन ह्या संस्थेनें ७६ टन अल्ड्रीन नांवाचें जंतुघ्न औषधहि विकत घेतलें आहे. ह्या औषधाच्या एका औंसानें एक एकर जमिनींतील टोळांचा नाश होतो.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाल्वेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९९,३८५ |

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. | ३३,४१,००० |
| ठेवी | रु. | ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,४३,९३,००० |

**१५ जिल्ह्यांत ६५ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.